नियमीत फौज. खटला क्र.१२७/२०२२ मधील निशाणी ४४ वरील आदेश

(CNR No.MHRT030017392022)

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपी क्र.२ गिरीष कन्हैयालाल ओसवाल याने पारपत्राचे नुतनीकरण/नविन पारपत्र मिळणेचे कामी परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. आरोपीचे कथन असे आहे की, प्रस्तुतचा खटला आरोपींचे विरुद्ध भा.दं.वि.क. ४२० सह ३४ कलमांन्वये दाखल करण्यात आलेला आहे. आरोपी क्र.२ हा रत्नागिरी येथील कायमचा रहिवासी असून तो तेली आळी, रत्नागिरी येथे रहातो. तो शांती मेडीकल्स, तसेच, शांती द ग्रँड पॅलेस, बिल्डर व्यवसाय या कंपनीचा भागीदार आहे. सन २०११ मध्ये आरोपी क्र.२ याने गाव मौजे पडवेवाडी, मिरजोळे, ता.जि.रत्नागिरी येथील स.नं.२७ हि.नं.४/१४ क्षेत्र ०.७८.५० ही मिळकत दिनेश पोपटलाल राठोड वगैरे २ यांच्याकडून विकत घेण्याचे नक्की केले व मिळकतीचा सर्व मोबदला दिनेश राठोड वगैरे २ यांना अदा केला व संपूर्ण मिळकतीचा मालक झाला. सदर मिळकत ही भोगवटा वर्ग २ ची असल्याने खरेदीखत नोंदवण्यासाठी शासनाची परवानगी घेणे आवश्यक होते. महसुल खाती अर्ज करुन सदर मिळकत अर्जदार यांनी बिनशेती करुन त्यामध्ये इमारत बांधण्याची परवानगी सुद्धा ग्रामपंचायत मिरजोळे यांच्याकडून घेतली आहे. त्यानंतर अर्जदार यांनी सदर मिळकत त्यांना दररोजचे व्यावसायिक व्यापामुळे विकसीत करणे शक्य होणार नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांनी सदरची मिळकत दि.०९/०२/२०११ रोजीचे विकसन करारानुसार आरोपी क्र.१ याला विकसनासाठी दिलेली होती. करारपत्राचे अटी शर्ती करारपत्रात नमूद करण्यात आलेल्या होत्या व आहेत. आरोपी नं.१ याने सदर मिळकतीमध्ये के.एफ.ओसवाल प्लाझा या नावाने इमारत बांधून पुर्ण करावयाची होती. त्यासाठी येणारा खर्च आरोपी क्र.१ याने करावयाचा होता. आरोपी क्र.१ याने करारपत्रातील अटी शर्तींचे पालन केले नाही. मिळकत विकसीत केली नाही. फिर्यादी/खरेदीदार यांचा व्यवहार पुर्ण करण्याची जबाबदारी पुर्णपणे आरोपी क्र.१ यांची आहे. फिर्यादी यांनी त्यांना सदनिका/गाळे/बांधकाम आरोपी क्र.१ याने न दिल्याने सदरची फिर्याद दाखल केली आहे. वास्तविक, दि.०९/०२/२०११

रोजीचे करारपत्राप्रमाणे आरोपी क्र.२ याची कोणतीही जबाबदारी नाही. दि.०९/०२/२०११ रोजीचे करारपत्राप्रमाणे अथवा रेकॉर्डप्रमाणे आरोपी क्र.२ याने फिर्यादीकडून कोणतीही रक्कम स्वीकारलेली नाही. या कामी केसचे चौकशीचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. चौकशीचे कामकाज चालून निकाल होईपर्यंत बराच कालावधी जाणार आहे. आरोपी क्र.२ यांचा पासपोर्ट नं.एन६९०८३६३ असा आहे. त्याची मुदत दि.०८/०२/२०१६ पासून दि.०७/०२/२०२६ पर्यंत होती. ती संपुष्टात आल्याने आरोपी क्र.२ याने सदर पारपत्र नुतनीकरण/नविन मिळणेसाठी पासपोर्ट ऑफीसमध्ये आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज केला आहे. त्याप्रमाणे पोलीस व्हेरिफिकेशन झाले आहे. पोलीस व्हेरिफिकेशनमध्ये सदर केसचा उल्लेख आल्याने पासपोर्ट ॲथोरिटी यांनी कोर्टाची संमती/परवानगी पासपोर्ट नुतनीकरणाचे कामी आवश्यक असल्याचे कळवले आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

३. प्रस्तुतच्या अर्जाला सुविद्य सरकारी वकीलांनी आक्षेप घेताना कथन केले की, सदरचा खटला ३ वर्षापेक्षा जास्त जुना आहे. आरोपींचे विरुद्ध दोषारोप नोंदवणेकरीता तारीख आहे. परंतु, आरोपींच्या गैरहजेरीमुळे दोषारोप नोंदवला नाही. सदर गुन्हा आरोपी क्र.१ व २ यांनी संगनमत करुन केलेला आहे. आरोपी क्र.२ चा प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास तो त्याचा गैरफायदा घेवून फरार होवू शकतो. त्यामुळे केसच्या चौकशीमध्ये विलंब होवू शकतो. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. सदर अर्जावर फिर्यादीने म्हणणे देवून कथन केले की, आरोपी क्र.२ याने सदर अर्जामध्ये परदेशी जाण्याचे कारण अथवा जाण्याचा तपशील दिलेला नाही. त्यामुळे योग्य त्या अटी शर्तींवर पासपोर्ट नुतनीकरणास परवानी देण्याबाबत हरकत नसल्याचे कथन केले.

५. सरकारतर्फे सुविद्य सरकारी वकील श्री. पी.ए.सावंत व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.आर.एस.पुनसकर यांचा युक्तीवाद ऐकला.

६. आरोपीतर्फे सुविद्य वकील श्री.आर.एस.पुनसकर यांनी असे म्हटले आहे की, आरोपी विरुद्ध प्रलंबित खटल्याचा कालावधी अनिश्चीत अशा स्वरुपाचा आहे. खटल्याच्या सुनावणीस अद्याप प्रारंभ झालेला नाही. अशा परिस्थीतीत, खटल्याच्या सुनावणीचा कालावधी निश्चीत करता येणार नाही. त्यामुळे मिनीस्ट्री ऑफ एक्स्टर्नल अफेअर्स केंद्र शासन यांनी नोटीफिकेशन नं.जीएसआर५७०(इ) दि. २५/०८/१९९३ चे नोटीफिकेशनप्रमाणे फौजदारी खटला प्रलंबित असताना पारपत्र नुतनीकरण करता येवू शकते अगर पारपत्र प्राप्त करण्यासाठी न्यायालय परवानगी देवू शकते. त्याचप्रमाणे खटला प्रलंबित असताना पारपत्र नुतनीकरण, परदेश गमनाची संधी अशा प्रकारच्या सवलती योग्य त्या अटी शर्तींवर आरोपीला प्रदान करता येवू शकतात. या युक्तीवादाच्या पृष्ठयर्थ त्यांनी ***आशुतोष पटनायक वि. स्टेट ऑफ ओरिसा, रिट पिटीशन क्र. ४८३४/२०२२,*** मे. ओरिसा उच्च न्यायालय यांच्या न्यायनिर्णयाचा दाखला दिला.

७. या विरुद्ध युक्तीवाद करताना सुविद्य सरकारी वकील श्री. पी.ए.सावंत यांनी असे स्पष्ट केले की, खटल्याची सुनावणी अद्याप प्रलंबित आहे. अशा परिस्थीतीत, जर आरोपीस परदेश गमनाची संधी दिल्यास खटल्याला आणखी काही कालावधी जावून दिरंगाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, आरोपी परदेशात पळून जाण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.

८. मी अर्जाचे काळजीपूर्वक अवलोकन केले आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. आरोपी क्र.२ हा सिंडीकेट बँकेसमोर, तेली आळी, रत्नागिरी ता. जि. रत्नागिरी येथील रहिवासी आहे. जर आरोपीला परदेशामध्ये जाणे अशक्य बनले तर आरोपीस व्यावसायीक अडचणीला सामोरे जावे लागणार आहे. आरोपी क्र.२ हा रत्नागिरी येथील स्थानिक रहिवासी आहे ही बाब अभियोग पक्षाने नाकारली नाही. त्याचे कुटूंब तेथे वास्तव्यास आहे. अशा परिस्थीतीत, पारपत्र नूतनीकरणासाठी परवानगी दिल्यास खटल्याची सुनावणी प्रलंबित राहिल हा अभियोग पक्षाचा युक्तीवाद स्वीकारार्ह रहात नाही.

९. आरोपीचा कायमस्वरुपी पत्ता १७५३, सिंडीकेट बँकेसमोर, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी असा असल्याचे दिसून येते. त्याचे कुटूंबिय त्या ठिकाणी रहातात. त्यामुळे कुटूंबाला सोडून, स्थावर मिळकत सोडून आरोपी क्र.२ हा कायमस्वरुपी परदेशी निघून जाईल ही शक्यता देखील गृहित धरता येत नाही. तो व्यावसायीक कारणाकरीता तात्पुरत्या स्वरुपात परदेश गमन करेल असे अर्जातील कथनांवरुन निष्कर्षीत करता येते.

१०. प्रस्तुतच्या खटल्याच्याकामी देखील आरोपीने त्याची हजेरी स्वतःमार्फत अगर वकीलांमार्फत वेळोवेळी लावलेली आहे. प्रस्तुतच्या खटल्याची सुनावणी अद्याप प्रलंबित आहे. प्रस्तुतच्या खटल्याची सुनावणी व त्याच्या निर्गतीसाठी लागणारा कार्यकाल निश्चीत करता येण्याजोगा नाही. पर्यायाने, जर पारपत्र नुतनीकरणास परवानगी दिली तर आरोपी नं.२ हा प्राप्त पारपत्राद्वारे परदेश गमन करेल व परदेश गमनाद्वारे आरोपीची खटल्यास असलेली गैरहजेरी खटल्याच्या दैनंदिन प्रगतीस कोणताही अडथळा ठरेल या निष्कर्षाप्रत जाता येत नाही.

११. पासपोर्ट अधिनियम, १९६७ कलम ६(फ) ची तरतुद व मिनीस्ट्री ऑफ एक्स्टर्नल अफेअर्स केंद्र शासन यांनी नोटीफिकेशन नं.जीएसआर५७० (इ) दि. २५/०८/१९९३ चे नोटीफिकेशन पाहता, आरोपीस योग्य त्या अटी शर्तींवर अर्ज मंजूर केल्यास खटल्याच्या सुनावणीसदेखील कोणताही अडथळा निर्माण होणार नाही असे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, न्यायाचे कारणास्तव मी खालील आदेश पारित करतो –

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. आरोपी क्र.२ गिरीष कन्हैयालाल ओसवाल याला पारपत्र नुतनीकरणाकरीता खालील अटी व शर्तींवर परवानगी देण्यात येते –

अ. मिनीस्ट्री ऑफ एक्स्टर्नल अफेअर्स केंद्र शासन यांनी नोटीफिकेशन नं.जीएसआर५७० (इ) दि. २५/०८/१९९३ चे नोटीफिकेशन व

पासपोर्ट अधिनियम, १९६७ कलम ६(फ) अन्वये आरोपीस एक वर्षाच्या मुदतीकरीता परेदश प्रवासासाठी/वास्तव्याकरीता पारपत्र जारी करण्यात यावे.

ब. आरोपीने परदेश गमनापुर्वी तो भविष्यात जात असलेल्या देशासंबंधी व त्याच्या सहलीच्या ठिकाणाची अगर त्या विषयाची आवश्यक ती माहिती परेदशी जाण्यापूर्वीच न्यायालयात सादर करणे त्यास बंधनकारक राहिल.

क. जर आरोपी परदेशी गेला तर भारतात परत आल्यानंतर, न्यायालयासमोर एक महिन्याच्या आत स्वतःहून हजर राहिल, अशी लेखी ग्वाही प्रतिज्ञा पत्रावर परदेशी जाण्यापूर्वी त्याने पासपोर्ट ॲथोरिटीकडे व न्यायालयाकडे देणे बंधनकारक राहिल.

ड. आरोपी भारतात परत आल्यानंतर, न्यायालयात खटल्याचे कामी हजर राहिल याकरीता त्याने रु.५०,०००/- चे हमीपत्र (Indemnity Bond) तो परदेशी जाण्यापूर्वी न्यायालयात सादर करावयाचे आहे.

इ. आरोपीच्या गैरहजेरीत त्याचे विधीज्ञ खटल्याच्या कामाकाजाकरीता हजर राहतील आणि त्याचे गैरहजेरीत त्याची ओळख आव्हानीत न करता खटल्याचे कामकाज नियमतीपणे चालवतील याची त्याने लेखी हमी प्रतिज्ञापत्राद्वारे (Undertaking Affidavit) परदेशी जाण्यापूर्वी द्यावी.

ई. या अटी व शर्तींचा भंग झाल्यास आरोपीस दिलेली पारपत्राची परवानगी रद्द होईल याची आरोपीने नोंद घ्यावी.

फ. आरोपी क्र.२ याने न्यायालयाच्या पुर्व परवानगीशिवाय देश सोडू नये.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUNAYANA SACHINKUMAR PINGALE
Date: 2026.04.16 17:41:16 +0530

दि. १६/०४/२०२६

(श्रीम.एस.एस.पिंगळे)
मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.S.Sane, Stenographer Grade II |
| Court Name | :- | The Court of Chief Judicial Magistrate, Ratnagiri |
| Date of decision | :- | 16/04/2026 |
| Judgment signed by PO. on | :- | 16/04/2026 |
| Judgment uploaded on | :- | 16/04/2026 |